# मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय,

# सालेकसा,जि.गोंदिया.

## भूगोल विभाग

## शैक्षणिक सत्र 2024 – 2025

### विविध कार्यक्रम, उपक्रम, विद्यार्थ्यी परिसंवाद,शैक्षणिक सहल,सर्वेक्षण

---

**1. सेमिनार : –** नविन शैक्षणिक धोरण 2020 नुसार विद्यार्थ्यांना कौशल्य शिकता यावे यासाठी नवनवीन संधी उपलब्ध करण्यात आले आहे. बी.ए. प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी भूगोल परिचय या विषयावर अंतिम वर्षातील विद्यार्थी नमन डोंगरे यांनी सेमिनार च्या माध्यामातून दिनांक 05.09.2024 ला विद्यार्थ्यांशी हितगुज केले.











**2. उपक्रम : –** भूगोल विभागाद्वारे प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांसाठी अक्षांस व रेखांश या अभ्यासक्रमाखाली एक उपक्रम राबविण्यात आले.विद्यार्थ्यांच्या राहते स्थळाची GPS तंत्रज्ञानाद्वारे अचूक अक्षांस व रेखांश चे वाचन दिनांक 26. 09.2024 करण्यात आले. या उपक्रमात शालिनी मरस्कोल्हे (तिरखेडी), सुहानी वलथरे (हलबीटोला), मुस्कान कटरे (गोर्रे), कोमल पागोटे (शेरपार),पूजा कुंभरे (मुरूमटोला) आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.


















**3. सेमिनार : –** NEP नुसार व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम या प्रकारानुसार प्रमाण व साखळी चे कौशल्य समजून घेण्यासाठी प्रमाण या विषयावर विद्यार्थ्यांचे seminar दि. 05.10.2024 ला घेण्यात आले.यामध्ये शालिनी मरस्कोल्हे, कोमल पागोटे, पुजा कुंभरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून ब्रिटिश व मॅट्रीक मापनी बद्यल विस्तृत माहिती दिली.






**4. सर्वेक्षण : –** व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमातंर्गत(Vocational skill course) अंतर्गत 2 क्रेडट साठी बी.ए. प्रथम सत्रातील विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयीन परिसरात साखळी सर्वेक्षण दि. 18.10.2024 ला घेण्यात आले.सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

https://www.facebook.com/share/p/1LJAvhU31N/



**5. सर्वेक्षण : –** बी.ए. पाचवे सत्रातील विद्यार्थ्यासाठी प्रात्यक्षिक विषय अंतर्गत Prismatic composs survey महाविद्यालय परिसरामध्ये दिनांक 22.10.2024 ला उपकरणाद्वारे संपूर्ण पध्दती व प्रक्रिया समजून घेण्यात आली.विद्यार्थ्यांनी दिगंश (bearing),कोन (Angle) आणि त्यांचे प्रकार याबद्यल विस्तृत माहिती गोळा केली.

https://www.facebook.com/share/p/18ibM91qgE/












**6. भूगोल दिन साजरा : –** महाविद्यालयातील भूगोल विभागाद्वारे दिनांक 14 जानेवारी 2025 ला जागतिक भूगोल दिनाचे आयोजन प्राचार्य डॉ. बी.के.जैन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. याप्रसंगी 2024 – 25 या शैक्षणिक वर्षासाठी भूगोल अभ्यास मंडळ स्थापन करून अध्यक्ष म्हणून कु. प्रगती शहारे यांची एकमताने निवड केली गेली. याप्रसंगी डॉ. एन.एम.हटवार, प्रा. साखरे, डॉ. अश्विन खांडेकर यांच्या समवेत सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

https://www.facebook.com/share/p/18yFvbQ8VC/






देशोन्नती

भूगोल दिन साजरा

**सालेकसा** : स्थानिक मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय सालेकसा येथे भूगोल विभागातर्फे भूगोल दिनाचे आयोजन प्राचार्य डॉ. बी. के. जैन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वीगोल चे पूजन करून करण्यात आली. पृथ्वीचे रक्षण या विषयावर डॉ. बी. के. जैन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. अश्विन खांडेकर यांनी ओझोन स्तराविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. भूगोल दिनाबद्दल शालिनी मरस्कोल्हे ,पूजा कुंभरे यांनी आपले मत मांडले. भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून यावर्षी कु. प्रगती शहारे या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन नमन डोंगरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रगती शहारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. नामदेव हटवार ,प्रा. बी. एन. साखरे ,डॉ. वर्षा गंगणे, डॉ. बी. जे . राठोड ,डॉ. पी. बी. डोंगरे , प्रा. वाय. आर. जोगी, प्रा. अरविंद भगत ,प्रा. रितू तुरकर, प्रा. मनोहर वाघेरे, प्रा. राकेश बहेकार, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

Gondia Edition
Jan 17, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com



**7. सर्वेक्षण : –** जमिनीचे मोजमाप, अंतर, भूपृष्ठ या विषयीचे ज्ञान मिळविण्यासाठी दिनांक 10.02.2025 ला बी.ए.सहावे सत्रातील विद्यार्थ्यांचे Dumpy level survey करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणाच्या पध्दती, संज्ञा आणि आराखडा तयार करून सर्वेक्षण समजून घेतले.

https://www.facebook.com/share/p/16LbLGdCxD/












**8. सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण : –** प्रात्यक्षिक भूगोलाच्या अंतर्गत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्यसाठी सालेकसा तालुक्यातील हलबीटोल या गावाला दिनांक 17.02.2025 ला बी.ए. सहावे सत्रातील विद्यार्थ्यांनी भेट देवून मुलाखत व प्रश्नापली या तंत्राद्वारे माहिती संकलित केली.गावातील लोकांचे उत्पन्न, व्यवसाय, शिक्षण, घरांचे प्रकार, आरोग्य, सामाजिक सहभाग, व गावातील समस्या जाणून त्यावर उपाययोजना सुचवून सर्वेक्षण पुर्ण केले.

https://www.facebook.com/share/p/16BUXWo6uf/












**9. सर्वेक्षण :–** व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमा (Vocational skill course) अंतर्गत समतल फलक सर्वेक्षण या कौशल्याचे ज्ञान मिळविण्यासाठी बी.ए. द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांनी दिनांक 25.02.2025 ला विकिरण व आंतरछेदन पध्दतीद्वारे सर्वेक्षण पूर्ण केले.












**10. सर्वेक्षण :–** Prismatic compass survey या व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमासाठी (Vocational skill course) दिनांक 3 मार्च 2025 ला बी. ए. द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसराचे भूमापन, कोन व आराखडा तयार करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.













**11. सेमिनार :–** विद्यार्थ्यांमध्ये मंच साहस, बोलण्याची कला व लेखन कौशल्य वाढावे या हेतुने दिनांक 6 मार्च 2025 ला बी.ए. द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यासाठी प्रिझमॅटीक कंपास सर्वेक्षण या विषयावर Vocational skill course अंतर्गत प्रात्यक्षिक सेमिनार चे आयोजन करण्यात आले.यामध्ये कोमल कोडवती, सूहानी वलथरे, पूजा कुंभरे, व शालिनी मरस्कोल्हे या विद्यार्थ्यांनी एकुण अंश (Degree) मोजण्याचे तंत्र व आराखडा उत्तमरित्या समजावून सांगितले.

https://www.facebook.com/share/p/16FF3KKBYe/












**12. शैक्षणिक सहल :–** नविन शैक्षणिक धोरण 2020 नुसार बी.ए.द्वितीय सत्रातील कौशल्य विकास अभ्यासक्रमावर आधारीत वन्यजीव सहल मार्गदर्शक विषयाचे शैक्षणिक सहल दिनांक 11.03.2025 ला हाजराफॉल या पर्यटन स्थळी नेण्यात आली.पर्यटक, मार्गदर्शक, स्थळ ओळख,भूरचना, वन्यजीव, वनस्पती याबद्यलची माहिती गोळा करून पर्यटक मार्गदर्शकाचे कौशल्य समजून घेतले.

https://www.facebook.com/share/p/1BPNrLuL95/






नवभारत

www.navbharatlive.com

## विद्यार्थियों की हाजराफॉल पर शैक्षणिक सहल

### वनस्पति व जीव-जंतुओं विषय पर विस्तृत चर्चा

■ सालेकसा, (त.सं). स्थानीय मनोहरभाई पटेल कला और वाणिज्य महाविद्यालय, सालेकसा के भूगोल विभाग के विद्यार्थियों ने 'वन्यजीव सहल मार्गदर्शक' इस कौशल विकास पाठ्यक्रम के तहत हाजराफॉल नामक प्राकृतिक पर्यटन स्थल का दौरा किया. यह शैक्षणिक दौरा प्राचार्य डा. बी. के. जैन के मार्गदर्शन में और डा. अश्विन खांडेकर के नेतृत्व में आयोजित हुई. नई शिक्षा नीति 2020 के अनुसार, विद्यार्थियों को क्षेत्रीय अध्ययन का अनुभव प्राप्त हो और वे पर्यावरण व पर्यटन स्थलों की जानकारी आत्मसात कर सकें, इस उद्देश्य से इस यात्रा का आयोजन किया गया था. इस दौरे के दौरान विद्यार्थियों ने हाजराफॉल के आसपास के भूगोल, वनस्पति और जीव-जंतुओं के बारे में गहन जानकारी प्राप्त की. साथ ही, पर्यटन स्थल के महत्व पर मार्गदर्शकों द्वारा मार्गदर्शन दिया गया. इस दौरे में राहुल गेडाम, पूजा कुंभरे, शालिनी मरस्कोल्हे, कोमल कोडवती, शिवानी खोटेले, सुहानी वलथरे, नामदेव बागडे व अन्य विद्यार्थियों ने उत्साहपूर्वक भाग लिया. इस शैक्षणिक उपक्रम के माध्यम से विद्यार्थियों को व्यवहारिक ज्ञान और पर्यटन क्षेत्र में उपलब्ध अवसरों के बारे में अनुभव प्राप्त हुआ.

Gondia Plus Edition
Mar 16, 2025 Page No. 2
Powered by: navbharatlive.com



**13. जल दिन आयोजन :–** भूगोल विभागाच्या वतीने दि. 21 मार्च 2025 ला जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या जल व मृदा संधारण विभागाचे जल संधारण अधिकारी श्री.एस.एस.मेश्राम., श्री.ऐश्वर्य एस. मेश्राम, कु. यु.आर.खंडाईत, श्री.व्ही.एस.पटले मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.पाण्याचे महत्व सांगून जल जागृतीसाठी विद्यार्थ्यांद्वारे नाटिका सादर करण्याात आली.

https://www.facebook.com/share/p/1A4vtTThJB/






देशोन्नती

## मनोहरभाई पटेल महाविद्यालयात जलदिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन

**सालेकसा** : स्थानिक मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र शासन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आदेशानुसार भूगोल विभागाच्या वतीने जागतिक जलदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. जैन होते.

कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वीगोल व प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात डॉ. जैन यांनी पाण्याचे महत्त्व पटवून देत जलसंधारणाची गरज अधोरेखित केली. प्रमुख मार्गदर्शक जलसंधारण अधिकारी एस. एस. मेश्राम यांनी पाण्याच्या संवर्धनावर सखोल मार्गदर्शन केले. ऐश्वर्य मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना जलप्रतिज्ञा दिली. यामुळे पाण्याबाबत जाणीव जागृती निर्माण झाली.

कार्यक्रमात 'पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा' या संकल्पनेवर आधारित नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले. प्रगती शहारे, काजल चौधरी आणि राधिका मरस्कोल्हे यांनी प्रभावी अभिनयाद्वारे पाण्याच्या महत्वाचा संदेश दिला. प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. अश्विन खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन दीप्ती चौरे तर आभारप्रदर्शन शालिनी मरस्कोल्हे यांनी मानले. या कार्यक्रमाला जलसंधारण अधिकारी कु. यु. आर. खंडाईत, व्ही. एम. पटले (जलसंपदा विभाग, सालेकसा) यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहून जलसंधारणाचा महत्वपूर्ण संदेश घेऊन गेले.

Gondia Edition
Mar 22, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com